क्रमांक ६८९९/ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : मे, २०२५
27 MAY 2025

:: प रि प त्र क : :

**विषय :- मा. सदस्यांना पुरविण्यात आलेल्या राज्याबाहेरील कुपन पुस्तकांच्या आधारे केलेल्या प्रवासाचा हिशेब सादर करण्याबाबत..**

मा. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ च्या नियम ३ (ब) प्रत्येकी रुपये ५,००० एवढे मूल्य असणाऱ्या तीन कुपन पुस्तकांचा एक संच, यामुळे त्याला महाराष्ट्र राज्याच्या बाहेर एकटयाने आणि सदस्याची पत्नी/तिचा पती आणि अज्ञान मुले किंवा सोबती यांना सदस्यांबरोबर महाराष्ट्र राज्यात किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर प्रवास करण्याचा हक्क प्राप्त होईल; तथापि, या कुपन पुस्तक संचावर केलेला एकूण प्रवास एका वित्तीय वर्षात तीस हजार किलोमीटरपेक्षा अधिक होता कामा नये. विद्यमान वित्तीय वर्ष सन २०२४-२०२५, दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपले आहे.

अत: आपणांस विनंती करण्यात येते की, आपण राज्याबाहेरील कुपन पुस्तकांचा वापर करुन दिनांक १ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या वित्तीय वर्षात केलेल्या राज्याबाहेरील प्रवासाचा हिशेब या सचिवालयास **सोमवार, दिनांक १६ जून, २०२५ रोजीपर्यंत सादर करावा.**

प्राकुळकर्णी

**(प्राजक्ता कुळकर्णी)**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**

\\Mls-h2-06\D\D -1\2025\railwaycoupon pending note and paripatrak\paripatrak.docx